| | |
|---|---|
| Event Name: | MIDC Nov 2014 Exam |
| Exam Name : | MIDC Assistant Slot 1 |
| Total Questions : | 100 |

## Type : Multiple Choice Single Correct

| |
|---|
| Q1. राष्ट्रीय स्तरावरही महत्वाचे गणले जाणारे 'परळी' येथील औष्णिक विद्युत केंद्र कोणत्या जिल्ह्यात आहे? |
| Option 1: औरंगाबाद |
| Option 2: बीड |
| Option 3: अकोला |
| Option 4: अमरावती |
| Correct Option : 2 |
| Q2. पंडिता रमाबाई यांनी आर्य महिला समाजाची स्थापना कोणाच्या सहकार्याने केली ? |
| Option 1: महादेव गोविंद रानडे |
| Option 2: डॉ. रामकृष्ण भांडारकर |
| Option 3: वामन आबाजी मोडक |
| Option 4: वरीलपैकी सर्व |
| Correct Option : 4 |
| Q3. एका दुकानदाराने दहा वस्तू २०० रुपयांमध्ये विकत घेतल्या. त्यापैकी दोन वस्तू खराब झाल्या उरलेल्या वस्तू जर त्याने २४० रुपयाना विकल्या , तर या व्यवहारात त्याला शेकडा किती नफा झाला? |
| Option 1: शे. २० |
| Option 2: शे. ४० |
| Option 3: शे. १० |
| Option 4: शे. ५० |
| Correct Option : 1 |
| Q4. रातआंधळेपणा खालीलपैकी कोणत्या जीवनसत्वाच्या अभावामुळे होतो? |
| Option 1: ड' जीवनसत्व |
| Option 2: क' जीवनसत्व |
| Option 3: अ' जीवनसत्व |
| Option 4: ब' जीवनसत्व |
| Correct Option : 3 |
| Q5. ध्वनीची तीव्रता _________या एककामधे मोजतात ? |
| Option 1: ऑम्पिअर |
| Option 2: वॅट |
| Option 3: डेसिबल |
| Option 4: यापैकी नाही. |
| Correct Option : 3 |
| Q6. एक वस्तू 64 रुपयांस विकल्यामुळे शे. 20 तोटा होतो. तर ती वस्तू किती रुपयांस विकावी म्हणजे शे. 20 नफा होईल ? |
| Option 1: 76 रु. |
| Option 2: 84 रु. |
| Option 3: 92 रु. |
| Option 4: 96 रु. |
| Correct Option : 4 |
| Q7. एकदा पु.लंकडे गप्पांना बहर आला होता. भाई नुकतेच बंगालातून आल्यामुळे रवींद्रनाथांचा विषय होता. रवींद्रनाथांचं संगीत, शिक्षणदृष्टी, भाषा वैभव असे विषय. अकस्मात माझं लक्ष बैठकीतल्या गुलाबाच्या कुंडीकडे गेले. ''भाई हि गुलाबाची कुंडी काही विशेष म्हणून इथे ठेवली आहे का?'' काहीसे डोळे मिटून ते म्हणाले, 'हा बिनकाट्याचा गुलाब आहे, आनंदवनातील आंधळ्या मुलांसाठी. आंधळ्या मुलांनी गुलाबाची वर्णने ऐकून गुलाबाच्या झाडाला स्पर्श करून पहिला पण नंतर त्याच्या हाताला रक्त आलं होतं. बाबांनी हे पाहिलं व ते कळवळले. मग मी ठरविले कि, या मुलांसाठी बिनकाट्याचा गुलाब घ्यायचा. खूप शोध घेतला आणि शेवटी हे झाड मिळालं; मुलांना हा गुलाब गोंजरू दे, स्पर्श करु दे. आता त्याची आनंदवनात बोळवण करायचीय. प्रश्न: बिनकाट्याच्या गुलाबाची बोळवण पु.ल. ना कुठे करावयाची आहे? |
| Option 1: अनाथालयात |
| Option 2: आनंदवनात |

| |
|---|
| Option 3: बालोद्यानात |
| Option 4: आनंद विहारात |
| Correct Option : 2 |
| Q8. भारताची सर्वात प्रदीर्घ सीमा या देशांबरोबर आहे. |
| Option 1: बांगलादेश |
| Option 2: पाकिस्तान |
| Option 3: चीन |
| Option 4: नेपाळ |
| Correct Option : 3 |
| Q9. माहिती अधिकार कायदा भारतीय गणराज्याच्या कितव्या वर्षी संसदेद्वारे अधिनियमित झाला ? |
| Option 1: 56 |
| Option 2: 60 |
| Option 3: 50 |
| Option 4: 40 |
| Correct Option : 1 |
| Q10. जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो. हा विचार सर्व संत-महंतांनी पुसून टाकण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. संताचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही, त्याला संतत्वाच्या आणि देवत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही. तोच खरा अस्पृश्य समजावा. आपल्या खांद्यावर जातीय उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे, ते फेकून केले पाहिजे, हे संतानी परोपरीने सांगितले आहे. पण माणसाचा मुर्दाडपणा अलौकिक आहे. संतांच्या कपाळावर त्याने जाती-वर्णाची लेबले तत्परतेने आणि धूर्तपणे चिकटविली. खरे तर साधूंचीच काय सर्व सामान्याचीही जात माणूसच असते, माणूसच असावी. माणसांची जाती वाढावी. मानव्याची उंची वाढत जावी, हे संतांचे स्वप्न आहे पण हे घडत नाही. प्र. संतत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कोणास लाभणार नाही? |
| Option 1: आस्तिकास |
| Option 2: मनात विषमता असणाऱ्यास |
| Option 3: भल्या माणसास |
| Option 4: परोपकारी माणसास |
| Correct Option : 2 |
| Q11. राष्ट्रपती ____ समोर शपथ घेतात |
| Option 1: उपराष्ट्रपती |
| Option 2: पंतप्रधान |
| Option 3: माजी राष्ट्रपती |
| Option 4: सरन्यायाधीश |
| Correct Option : 4 |
| Q12. बहुपर्यायी चाचण्यांमध्ये गुण मोजण्यासाठी कोणता स्कॅनर वापरतात? |
| Option 1: MICR |
| Option 2: OCR |
| Option 3: OMR |
| Option 4: कार्ड रीडर |
| Correct Option : 3 |
| Q13. निकट पूर्ववर्ती पोट - कलमान्वये कोणतीही जमीन राज्य शासनाकडे निहित होईल त्याबाबतीत राज्य शासनास , लेखी नोटिशीद्वारे , जिच्या कब्जात जमीन असेल त्या व्यक्तीस , नोटीस बजावल्यापासून किती दिवसांच्या आत , राज्य शासनास जमिनीचा ताबा स्वाधीन करण्याबद्दल आदेश देता येतो? |
| Option 1: 30 |
| Option 2: 15 |
| Option 3: 20 |
| Option 4: 45 |
| Correct Option : 1 |

| | |
|---|---|
| Q14. सूर्यबिंब लाल झाले होते. पण ती पराक्रमाची लाली वाटत नव्हती. श्रेष्ठ व महान पुरुष आपत्काळीसुद्धा विलक्षण धैर्याने वागतो त्या वेळी त्याच्या मुखावर जी अपूर्व शोभा झळकत असते, तशीच हि वाटत होती. क्षणभर सुद्धा विसावा न घेता, जगाची एवढी सेवा करणारा हा कर्मयोगी, जगातील कृतघ्नतेच्या जाणीवेमुळे जणू काही कष्टी झाला आहे, असे वाटत होते. जगाचा कानाकोपरा प्रकाशणारा, अनंत जीवांना जीवनसत्त्वे देणारा प्रवासी एक मुक्काम करून दुसऱ्या मुक्कामाकडे जायला निघाला होता. जगाचे इतिवृत्त विश्व निर्मात्याकडे रुजू करण्यासाठी जात असावा. मनुष्य जे काही करीत असतो, त्याला साक्षीदार सृष्टीतील प्रभावी द्रव्ये असतात. चंद्र, सूर्य आणि हि भूमी ह्या सर्वांना मनुष्य शरीराने जे करतो आणि मनाने चिंततो ते अवगत असते, असे धर्मशास्त्र सांगते. या उताऱ्यातील वर्णन कोणत्या वेळचे आहे? |
| Option 1: सकाळचे |
| Option 2: संध्याकाळचे |
| Option 3: दुपारचे |
| Option 4: रात्रीचे |
| Correct Option : 2 |

| | |
|---|---|
| Q15. लँड ऑफ मिडनाइट सन' हे नाव याला दिलेले आहे |
| Option 1: नॉर्वे |
| Option 2: स्वीडन |
| Option 3: डेन्मार्क |
| Option 4: डब्लीन |
| Correct Option : 1 |

| | |
|---|---|
| Q16. अर्जदाराचे कोणतेही नुकसान अथवा अन्य हानीस जबाबदार सार्वजनिक प्राधिकरणाला भरपाई देण्याचे आदेश देण्याचे अधिकार .... ला आहे . |
| Option 1: केंद्रीय माहिती आयोग/ राज्य माहिती आयोग |
| Option 2: राज्य जन माहिती आयोग |
| Option 3: केंद्रीय जन माहिती आयोग |
| Option 4: राज्यपाल |
| Correct Option : 1 |

| | |
|---|---|
| Q17. राष्ट्रपती संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे? |
| Option 1: राष्ट्रपती पदाची मुदत पाच वर्ष असते |
| Option 2: राष्ट्रपतीस राजीनामा द्यावायचा असल्यास त्यांनी तो उपराष्ट्रपती कडे सादर करावा लागतो |
| Option 3: राष्ट्रपतीला राष्ट्रपती पदाची निवडणूक दुसऱ्यांदा लढविता येत नाही |
| Option 4: राष्ट्रपतीपदासाठी उमेदवार हा भारतीय नागरिक असावाच लागतो. |
| Correct Option : 3 |

| | |
|---|---|
| Q18. महाराष्ट्र औद्योगिक धोरण 2013 प्रमाणे कोणत्या उत्पादक घटकांना अतिविशाल किंवा विशाल प्रकल्प म्हणून संबोधण्यात येईल ? |
| Option 1: स्थिर भांडवली गुंतवणूक असलेले |
| Option 2: प्रत्यक्ष नियमित रोजगार निर्माण करणारे |
| Option 3: विशाल व अवजड वस्तूंचे उत्पादन करणारे |
| Option 4: पर्याय 1 व 2 |
| Correct Option : 4 |

| | |
|---|---|
| Q19. 1.2 X 0.9 +32.5 X 0.8 = ? |
| Option 1: 28.08 |
| Option 2: 280.8 |
| Option 3: 26.08 |
| Option 4: 27.08 |
| Correct Option : 4 |

| | |
|---|---|
| Q20. महाराष्ट्र औद्योगिक धोरण 2013 अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये कोणत्या प्रकल्पांना प्राधान्याने भूखंड वाटप केले जाईल? |
| Option 1: विशाल |
| Option 2: अति विशाल |
| Option 3: लघु |
| Option 4: सूक्ष्म |
| Correct Option : 1 |

| | |
|---|---|
| Q21. पदार्थाचा 'विशिष्ट उष्मा' कशाच्या साह्याने काढतात ? |
| Option 1: कॅलरी मापी |

Option 2: तापमापी
Option 3: मोजपात्र
Option 4: मोजपट्टी
Correct Option : 1

Q22. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सभापती कोण असतो?
Option 1: पदसिद्ध उद्योग राज्य मंत्री
Option 2: पदसिद्ध उद्योग मंत्री
Option 3: मुख्यमंत्री
Option 4: विधानसभा अध्यक्ष
Correct Option : 2

Q23. दिल्ली – मुंबई औद्योगिक कॉरिडॉर मध्ये महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्याचा समावेश नाही ?
Option 1: अहमदनगर
Option 2: नागपुर
Option 3: धुळे
Option 4: नाशिक
Correct Option : 2

Q24. एक वस्तू १५० रुपयास विकल्यामुळे विक्रेत्याला शेकडा २० तोटा झाला , तर त्या वस्तूची खरेदी किंमत किती?
Option 1: १८७.५० रु.
Option 2: १८० रु.
Option 3: १२५ रु.
Option 4: १२० रु.
Correct Option : 1

Q25. भारताचा पहिला कृत्रिम उपग्रह कोणता?
Option 1: आर्यभट्ट
Option 2: कल्पना
Option 3: भास्कर
Option 4: IRS
Correct Option : 1

Q26. भरपाईची रक्कम ठरविण्यात येईल तेव्हा तिच्या वाटपासंबंधात किंवा तिचा भाग ज्यांना देणे असेल त्या व्यक्तींमध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकाऱ्यास असा वाद कोणाकडे पाठवावा लागतो ?
Option 1: राज्य शासनाकडे
Option 2: न्यायालयाकडे
Option 3: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सचिवाकडे
Option 4: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वित्तीय अधिकाऱ्याकडे
Correct Option : 2

Q27. १७२८ हा कोणत्या संख्येचा घन आहे?
Option 1: 32
Option 2: 22
Option 3: 12
Option 4: 42
Correct Option : 3

Q28. 354 X 162 = 57384 तर 3.54 X 16.2 = ?
Option 1: 573.48
Option 2: 57.348
Option 3: 5734.8
Option 4: 5.7348
Correct Option : 2

Q29. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सभापतीच्या अनुपस्थितीत त्यांची कामे व कर्तव्ये कोण पार पाडतो?
Option 1: उपसभापती
Option 2: सचिव

| |
|---|
| Option 3: वित्तीय सल्लागार |
| Option 4: राज्यपाल |
| Correct Option : 1 |
| Q30. विद्युत दिव्याच्या आत .....हा वायू असतो? |
| Option 1: हवा |
| Option 2: ऑक्सिजन |
| Option 3: नायट्रोजन |
| Option 4: कार्बनडाय ऑक्साईड |
| Correct Option : 3 |
| Q31. भारताचा नियंत्रक आणि महालेखा परीक्षकाची नियुक्ती कोणाकडून होते? |
| Option 1: राष्ट्रपती |
| Option 2: पंतप्रधान |
| Option 3: वित्तमंत्री |
| Option 4: सभापती |
| Correct Option : 1 |
| Q32. ..........यांना ' भारतीय अर्थशास्त्राचे जनक' म्हणून ओळखले जाते. |
| Option 1: दादाभाई नौरोजी |
| Option 2: वी.म.दांडेकर |
| Option 3: लोकहितवादी |
| Option 4: शंतनूराव किर्लोस्कर |
| Correct Option : 1 |
| Q33. A आणि B यांनी भागीदारीने केलेल्या व्यवसायात त्यांच्या भांडवलांचे गुणोत्तर 5 : 8 होते आणि मुदतींचे गुणोत्तर 4 : 3 होते. तर त्यांच्या नफा वाटणीचे गुणोत्तर काय असेल ? |
| Option 1: 2 : 3 |
| Option 2: 3 : 4 |
| Option 3: 5 : 6 |
| Option 4: 6 : 5 |
| Correct Option : 3 |
| Q34. सांसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत श्री नरेंद्र मोदी यांनी कोणते गाव दत्तक घेतले आहे ? |
| Option 1: रावळ |
| Option 2: जयापूर |
| Option 3: नेल्लोर |
| Option 4: अहमदाबाद |
| Correct Option : 2 |
| Q35. नवीन रोजगार निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक धोरणाने कोणते कार्यतंत्र स्वीकारले आहे? 1. सूक्ष्म लघु व मध्यम उपक्रमांच्या विकासावर भर देणे 2. रोजगाराभिमुख विशाल प्रकल्पांना अधिक प्रोत्साहन देणे. 3. राज्याच्या व केंद्राच्या कुशल मनुष्यबळ विकसित करणाऱ्या विविध योजनांचा वापर करणे 4. कृषी प्रक्रिया क्षेत्रावर भर देणे |
| Option 1: सर्व पर्याय बरोबर |
| Option 2: फक्त पर्याय 1,2,3 बरोबर |
| Option 3: फक्त पर्याय 2 व 3 बरोबर |
| Option 4: सर्व पर्याय चुकीचे |
| Correct Option : 1 |
| Q36. हरीने त्याचा मित्र अशोककडून ४००० रु. २ वर्षासाठी कर्जाऊ घेतले , व्याजाचा दर द.सा.द.शे. १० असल्यास त्याला २ वर्षानंतर अशोकला किती रक्कम परत करावी लागेल ? |
| Option 1: ८०० रु. |
| Option 2: ३२०० रु. |
| Option 3: ४०२० रु. |
| Option 4: ४८०० रु. |
| Correct Option : 4 |
| Q37. विधान परिषद बरखास्त करण्याचा अधिकार कोणाचा आहे ? |

Option 1: राष्टपती

Option 2: संसद

Option 3: पंतप्रधान

Option 4: विधानसभा

Correct Option : 4

Q38. अणुभट्टीत खालीलपैकी कोणत्या कार्यक्षम पदार्थाच्या आधारे न्युट्रॉनची गती कमी करण्यात येते.

Option 1: हिलियम

Option 2: नायट्रोजन

Option 3: जड पाणी

Option 4: ऑक्सिजन

Correct Option : 3

Q39. पाच अंकी लहानात लहान संख्येमधून तीन अंकी मोठ्यात मोठी संख्या वजा केली तर बाकी किती उरेल ?

Option 1: 9901

Option 2: 9091

Option 3: 9001

Option 4: 9109

Correct Option : 3

Q40. सॉफ्टवेअरचे 2 प्रकार असतात. सिस्टीम सॉफ्टवेअर व ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर. खालीलपैकी ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर कोणते?

Option 1: Microsoft Word

Option 2: Windows XP

Option 3: Linux

Option 4: Windows 2003

Correct Option : 1

Q41. एका बँकेत दर सहामाहीला व्याजाची आकारणी करून व्याज खात्यावर जमा करतात. 10 टक्के दराने ठेवलेल्या 5000 रुपयांचे एक वर्षानंतर किती रक्कम खात्यावर जमा आढळेल ?

Option 1: 5512.5

Option 2: 5515.2

Option 3: 5500.5

Option 4: 5525

Correct Option : 1

Q42. खालीलपैकी कोणत्या मूलद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे पिकाच्या शेवटच्या कळ्यावर दिसून येतात ?

Option 1: नत्र

Option 2: पालाश

Option 3: जस्त

Option 4: बोरॉन

Correct Option : 4

Q43. अलीकडील काळात पर्यटकांचे आकर्षण बनू लागलेले 'गणपतीपुळे' हे समुद्रकिनाऱ्यावरील निसर्गरम्य स्थान खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात मोडते ?

Option 1: सिंधुदुर्ग

Option 2: रत्नागिरी

Option 3: रायगड

Option 4: ठाणे

Correct Option : 2

Q44. शिकागो येथील जागतिक सर्वधर्म परिषदेमध्ये हिंदू धर्माचे प्रतिनिधीत्व कोणी केले?

Option 1: स्वामी दयानंद सरस्वती

Option 2: महर्षी वी.रा .शिंदे

Option 3: श्रीमती ॲनी बेझंट

Option 4: स्वामी विवेकानंद

Correct Option : 4

Q45. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कोणत्याही वेळी कमाल किती रक्कम कर्जाऊ घेता येईल ?

| |
|---|
| Option 1: ७५ कोटी रुपये |
| Option 2: ५० कोटी रुपये |
| Option 3: ८० कोटी रुपये |
| Option 4: १०० कोटी रुपये |
| Correct Option : 1 |

| |
|---|
| Q46. राजश्री शाहू महाराजांचे मुळ नाव काय ? |
| Option 1: जयसिंग यशवंतराव घाटगे |
| Option 2: आबासाहेब जयसिंग घाटगे |
| Option 3: आबासाहेब यशवंतराव घाटगे |
| Option 4: यशवंतराव जयसिंगराव घाटगे |
| Correct Option : 4 |

| |
|---|
| Q47. भारताचे उपराष्ट्रपती कोण आहेत? |
| Option 1: प्रणब मुखर्जी |
| Option 2: मोहम्मद हमीद अन्सारी |
| Option 3: ए पी जे अब्दुल कलाम |
| Option 4: यापैकी नाही |
| Correct Option : 2 |

| |
|---|
| Q48. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक क्षेत्रे कोणत्या स्थानिक प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली येतात? |
| Option 1: महानगरपालिका |
| Option 2: नगरपरिषद |
| Option 3: ग्रामपंचायत |
| Option 4: वरीलपैकी सर्व |
| Correct Option : 4 |

| |
|---|
| Q49. भारतातील सर्वात उंच द्वार असलेला बुलंद दरवाजा कोठे आहे |
| Option 1: आग्रा |
| Option 2: जयपूर |
| Option 3: जेसलमेर |
| Option 4: फत्तेपूरसिक्री |
| Correct Option : 4 |

| |
|---|
| Q50. माहितीचा अधिकार अधिनियमन खाली माहिती मागण्याचा अधिकार कोणाला आहे ? |
| Option 1: विदेशी व्यक्ती |
| Option 2: सर्व भारतीय नागरिक |
| Option 3: इतर राष्ट्रांचे दूत |
| Option 4: वरील सर्वांना |
| Correct Option : 2 |

| |
|---|
| Q51. एक रकमेचे 2 वर्षांचे सरळव्याज 600 रु. आणि चक्रवाढव्याज 645 रु. होते. तर व्याजाचा दर काय असावा ? |
| Option 1: 10 % |
| Option 2: 12 % |
| Option 3: 15 % |
| Option 4: 14 % |
| Correct Option : 3 |

| |
|---|
| Q52. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या खालीलपैकी कोणत्या सदस्यास महामंडळाच्या किंवा त्याच्याखालील कोणत्याही समितीच्या किंवा महामंडळाने अथवा महामंडळासाठी हाती घेतलेल्या कामाच्या संबंधात नेमलेल्या समितीच्या सभांना उपस्थित राहण्यास लागलेला वैयक्तिक खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी पूरक मानधन किंवा भत्ता दिला जातो ? |
| Option 1: राज्य वीज मंडळाचा अध्यक्ष |
| Option 2: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सचिव |
| Option 3: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सभापती |
| Option 4: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा वित्तीय सल्लागार |
| Correct Option : 1 |

| |
|---|
| Q53. भारतीयांनी १८५७ मध्ये इंग्रजी सत्तेविरूद्ध उठाव केला . कोणत्या गव्हर्नर-जनरलला १८५७ च्या उठावासाठी जबाबदार धरले जाते? |

| |
|---|
| Option 1: लॉर्ड डलहौसी |
| Option 2: लॉर्ड कॅनिंग |
| Option 3: लॉर्ड आर्मस्ट्रॉंग |
| Option 4: लॉर्ड एडनबरो |
| Correct Option : 1 |
| Q54. १५० चा शेकडा ६० काढून येणाऱ्या संख्येचा शे. ६० मूळ संख्येतून कमी केला, तर मूळ संख्या कितीने कमी झाली? |
| Option 1: 96 |
| Option 2: 54 |
| Option 3: 90 |
| Option 4: 30 |
| Correct Option : 2 |
| Q55. S आणि R यांनी केलेल्या व्यापारात मिळालेल्या नफ्याची वाटणी 6 : 5 या गुणोत्तरात केली. त्यांच्या भांडवलांच्या मुदतीचे गुणोत्तर 2 : 1 असल्यास भांडवलांचे गुणोत्तर कोणते असावे ? |
| Option 1: 4 : 5 |
| Option 2: 5 : 3 |
| Option 3: 3 : 5 |
| Option 4: 2 : 5 |
| Correct Option : 3 |
| Q56. खालीलपैकी कितवी लोकसभा पाच वर्षापेक्षा अधिक काळ अस्तित्वात होती? |
| Option 1: चौथी |
| Option 2: सहावी |
| Option 3: आठवी |
| Option 4: पाचवी |
| Correct Option : 4 |
| Q57. ७५ रुपये रकमेचे ३ महिन्यांचे द.सा.द.शे. ८ दराने किती रुपये सरळव्याज मिळेल ? |
| Option 1: १.०२५ रु. |
| Option 2: १८ रु. |
| Option 3: १५ रु. |
| Option 4: १.५ रु |
| Correct Option : 4 |
| Q58. आजच्या काळात सामाजिक व आर्थिक विकासाचे साधन म्हणून शिक्षणा कडे पाहिले जाते. स्थितिशीलता हि समाजव्यवस्थेची आदिप्रेरणा असते. आधुनिक काळातील गतिमानता या स्थितीशिलतेला हादरा देते. गतिमानता हे आधुनिक काळाचे मानचिन्ह आहे. त्याचा परिणाम शिक्षणासारख्या एका महत्वाच्या घटकावर झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे साधन मानले. शिक्षण हे माणसाच्या बुद्धीची जोपासना करते. त्याच्या अस्तित्वाची त्याला जाणीव करून देते. अस्तित्वाची जाणीव हि मानवी जीवनातील मुलभूत जाणीव आहे. डॉ. बाबासाहेब तिचे महत्व पटवून देताना म्हणतात, कि ‘उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो’. प्रश्न : शिक्षणाच्या अभावामुळे माणूस कसा बनतो? |
| Option 1: अल्पायुषी |
| Option 2: दीर्घायुषी |
| Option 3: निर्बुद्ध |
| Option 4: हुशार |
| Correct Option : 3 |
| Q59. एखाद्या व्यक्तीला इ-मेल पाठविण्यासाठी तुम्हाला त्या व्यक्तीचा इ-मेल अड्रेस माहित असणे आवश्यक आहे. खालीलपैकी योग्य इ-मेल अड्रेस कोणता ? |
| Option 1: www.abc.com |
| Option 2: www.abc@com |
| Option 3: xyz@abc.com |
| Option 4: xyz.abc@com |
| Correct Option : 3 |
| Q60. विनोदने एकाकडून सरळव्याजाने ७००० रु. कर्जाऊ घेतले. साडेचार वर्षानंतर ९८३५ रु. देऊन कर्जफेड केली तर व्याजाचा दर किती ? |
| Option 1: १८ % |

| | |
|---|---|
| Option 2: ९ % | |
| Option 3: १५ % | |
| Option 4: १७ % | |
| Correct Option : | 2 |

| | |
|---|---|
| Q61. ...... हे पदावर असताना मृत्यू पावलेले पहिले भारतीय पंतप्रधान होत. | |
| Option 1: जवाहरलाल नेहरू | |
| Option 2: लालबहादूर शास्त्री | |
| Option 3: चरणसिंग | |
| Option 4: इंदिरा गांधी | |
| Correct Option : | 1 |

| | |
|---|---|
| Q62. 87654 या संख्येतील 7 आणि 5 या अंकांच्या स्थानिक किमतीमध्ये फरक किती ? | |
| Option 1: 650 | |
| Option 2: 6500 | |
| Option 3: 6590 | |
| Option 4: 6950 | |
| Correct Option : | 4 |

| | |
|---|---|
| Q63. पाठीचा कणा असलेला प्राणी ओळखा. | |
| Option 1: गोगलगाय | |
| Option 2: ससा | |
| Option 3: कृमी | |
| Option 4: झुरळ | |
| Correct Option : | 2 |

| | |
|---|---|
| Q64. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्यांचा सेवेचा कालावधी किती असतो ? | |
| Option 1: 3 | |
| Option 2: 5 | |
| Option 3: 4 | |
| Option 4: 2 | |
| Correct Option : | 1 |

| | |
|---|---|
| Q65. भारतीय संविधानानुसार(घटनेनुसार) अंतिम सत्ता हि - - दिलेली आहे. | |
| Option 1: पंतप्रधानाकडे | |
| Option 2: मंत्रिमंडळाकडे | |
| Option 3: राष्ट्रपतींकडे | |
| Option 4: जनतेकडे | |
| Correct Option : | 4 |

| | |
|---|---|
| Q66. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील 'अभियांत्रिकी कामे ' या संज्ञेत कशाचा समावेश होतो ? | |
| Option 1: एखाद्या रस्त्यावर जाण्यायेण्याच्या मार्गाची योजना करणे | |
| Option 2: उद्योग धंद्यांना जागा देणे | |
| Option 3: दगडाचे खाणकाम | |
| Option 4: जमिनीवर किंवा जमिनीच्या खाली इमारती बांधकाम | |
| Correct Option : | 1 |

| | |
|---|---|
| Q67. हवामान दर्शक नकाशावर, समान सुर्यप्रकाश असलेली ठिकाणे ज्या रेषांनी जोडून दाखविली जातात त्या रेषांना असे म्हणतात | |
| Option 1: इसोबार्स | |
| Option 2: इसोहाइट्स | |
| Option 3: इसोथर्मस | |
| Option 4: इसोहेल्स | |
| Correct Option : | 4 |

| | |
|---|---|
| Q68. न्या.म.गो.रानडे यांच्या मते आपल्या देशातील समाजसुधारणेची चळवळ समाजातील श्रेष्ठ जनांच्या नेतृत्वाखाली होणार, कारण - - - - | |
| Option 1: समाजात हळूहळू बदल होणार. | |
| Option 2: राज्यव्यवस्थेचा आधार. | |
| Option 3: स्त्री शिक्षणाचा अभाव. | |

| |
|---|
| Option 4: जातीव्यवस्थेची उतरंड |
| Correct Option : 4 |

| |
|---|
| Q69. सूर्यमाला, पल्सार, महास्फोटक तारा यांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील एकमेव दुर्बीण कोठे आहे? |
| Option 1: मुंबई |
| Option 2: खोडद |
| Option 3: औरंगाबाद |
| Option 4: जालना |
| Correct Option : 2 |

| |
|---|
| Q70. बायोरेमेडीयेशन प्रक्रीये द्वारा -------- सारखी घातक प्रदूषके निसर्गातून संपूर्णतः काढता येतात. |
| Option 1: अल्फा टॉक्सीन |
| Option 2: पॉलीएस्टरस |
| Option 3: पॉली ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स |
| Option 4: पॉलीएथिलिन |
| Correct Option : 3 |

| |
|---|
| Q71. शिक्षण विभागाचे काम भारत सरकारच्या कोणत्या मंत्रालया अंतर्गत चालते? |
| Option 1: संसदीय कार्य |
| Option 2: मानव संसाधन विकास |
| Option 3: गृह कार्य |
| Option 4: महिला व बाल विकास |
| Correct Option : 2 |

| |
|---|
| Q72. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सर्व परवाने, आदेश, निर्णय, नोटीसा आणि इतर दस्तऐवज कोणाच्या सहीने अधिप्रमाणित केले जातात ? |
| Option 1: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या |
| Option 2: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वित्तीय सल्लागाराच्या |
| Option 3: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सभापतीच्या |
| Option 4: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपसभापतीच्या |
| Correct Option : 1 |

| |
|---|
| Q73. महाराष्ट्राचे १८ वे मुख्यमंत्री ज्यांनी वर्ष २०१४ मध्ये मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली त्यांचे नाव काय? |
| Option 1: शरद पवार |
| Option 2: पृथ्वीराज चौहान |
| Option 3: देवेंद्र फडणवीस |
| Option 4: मनोहर जोशी |
| Correct Option : 3 |

| |
|---|
| Q74. महाराष्ट्रात दुय्यम औद्योगिक कॉरिडॉर उभारल्यामुळे काय होईल? |
| Option 1: विदर्भ, मराठवाडा आणि कोकण भागातील प्रदेश विकसित होतील |
| Option 2: अन्न व कृषी प्रक्रिया उद्योगांचा विकास होईल |
| Option 3: लॉजिस्टिक व वेअर हाउसिंग उद्योगांचा विकास होईल |
| Option 4: वरीलपैकी सर्व |
| Correct Option : 4 |

| |
|---|
| Q75. खालीलपैकी पृथ्वीच्या सगळ्यात जवळची खगोलीय वस्तू कोणती ? |
| Option 1: सूर्य |
| Option 2: चंद्र |
| Option 3: शुक्र |
| Option 4: बुध |
| Correct Option : 2 |

| |
|---|
| Q76. लोकसभेच्या सभासदाने आपला राजीनामा स्वतः च्या सहीने .......कडे पाठविला पाहिजे |
| Option 1: राष्ट्रपती |
| Option 2: उपराष्ट्रपती |
| Option 3: लोकसभा अध्यक्ष |
| Option 4: यापैकी नाही |

| |
|---|
| Correct Option :   3 |
| Q77. 16 + 5 X 6 ÷ 3 X 8 + 12 ÷ 4 = ? |
| Option 1: 21 |
| Option 2: 47 |
| Option 3: 125 |
| Option 4: 99 |
| Correct Option :   4 |
| Q78. फाईलचे ४ प्रकार आहेत. डॉक्यूमेंट, वर्कशीट, डेटाबेस व प्रेझेन्टेशन फाईल. वर्ड प्रोसेसर यापैकी कोणत्या प्रकारची फाईल तयार करतात? |
| Option 1: डॉक्यूमेंट |
| Option 2: वर्कशीट |
| Option 3: प्रेझेन्टेशन |
| Option 4: डेटाबेस |
| Correct Option :   1 |
| Q79. ऑक्टोबर २०१४ मध्ये स्वच्छ भारत अभियान कोणी जाहीर केले? |
| Option 1: बाबा रामदेव |
| Option 2: नरेंद्र मोदी |
| Option 3: बालाजी तांबे |
| Option 4: अरविंद केजरीवाल |
| Correct Option :   2 |
| Q80. खालीलपैकी कोणाची नेमणूक करण्याचे अधिकार राष्ट्रपतीला नाहीत |
| Option 1: राज्यपाल |
| Option 2: राजदूत |
| Option 3: मुख्यमंत्री |
| Option 4: उपराष्ट्रपती |
| Correct Option :   4 |
| Q81. ६०० विद्यार्थ्यांपैकी २४० मुली आहेत, तर मुलींचे शेकडा प्रमाण किती आहे? |
| Option 1: 2.5 |
| Option 2: 0.6 |
| Option 3: 0.4 |
| Option 4: 0.24 |
| Correct Option :   3 |
| Q82. भारत सरकारच्या कोणत्या मंत्रालयातर्फे सामायिक सुविधा केंद्रांसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते? |
| Option 1: ग्रामीण विकास मंत्रालय |
| Option 2: सूक्ष्म लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय |
| Option 3: शिक्षण मंत्रालय |
| Option 4: गृह मंत्रालय |
| Correct Option :   2 |
| Q83. रायगड जिल्ह्यातील ----------- हे अभयारण्य राज्यातील पहिले पक्षी अभयारण्य म्हणून ओळखले जाते. |
| Option 1: कर्नाळा |
| Option 2: किहीम |
| Option 3: किनवट |
| Option 4: नर्नाळा |
| Correct Option :   1 |
| Q84. मराठीतील पहिले दैनिक वृत्तपत्र कोणते ? |
| Option 1: केसरी |
| Option 2: मराठा |
| Option 3: दर्पण |
| Option 4: ज्ञानप्रकाश |
| Correct Option :   4 |
| Q85. खालीलपैकी कोण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सदस्य होण्यास पात्र नाही ? |

Option 1: राज्य वीज मंडळाचा अध्यक्ष
Option 2: महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे व्यवस्थापन संचालक
Option 3: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा असा कर्मचारी जो मुख्य कार्यकारी अधिकारी नाही
Option 4: महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती
Correct Option : 3

Q86. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९' ने खालीलपैकी कोणती दोन शहरे जोडली आहेत ?
Option 1: मुंबई-विजयवाडा
Option 2: पुणे -सोलापूर
Option 3: मुंबई-सोलापूर
Option 4: मुंबई-हैद्राबाद
Correct Option : 2

Q87. एका अभयारण्यात सुरवातीला १६०० प्राणी होते. प्राण्याच्या संख्येत तेथे दरसाल ५ % वाढ होते असे आढळले ; तर २ वर्षाच्या अखेरीस प्राण्याची संख्या किती होईल ?
Option 1: 1764
Option 2: 1864
Option 3: 1664
Option 4: 1564
Correct Option : 1

Q88. सार्वजनिक सभा हि उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाखालील सभा असल्याचे प्रतिपादन करून दीन - दलितांची गाऱ्हाणी सरकार दरबारी मांडण्यासाठी .....यांनी सन १८८५ मध्ये 'दीनबंधू सार्वजनिक सभे' ची स्थापना केली होती.
Option 1: महात्मा जोतीबा फुले
Option 2: डॉ.विश्राम रामजी घोले
Option 3: नारायणराव लोखंडे
Option 4: कृष्णराव भालेकर
Correct Option : 4

Q89. लॉर्ड वेलस्ली कशासाठी भारताच्या इतिहासात सर्वाधिक प्रसिद्ध आहे ?
Option 1: कायम धारा पद्धती
Option 2: खालसा फौज
Option 3: रयतवारी पद्धती
Option 4: तैनाती फौज
Correct Option : 4

Q90. कोणत्या वायुमुळे मुख्यत्वे ओझोन थराचा ऱ्हास होतो ?
Option 1: कार्बन डाय ऑक्साईड
Option 2: नायट्रोजन डाय ऑक्साईड
Option 3: मिथेन
Option 4: क्लोरो फ्लूरो कार्बन
Correct Option : 4

Q91. संकेत स्थळाच्या मुख्य पानाला काय म्हणतात ?
Option 1: ब्राउजर
Option 2: बुकमार्क
Option 3: सर्च पेज
Option 4: होम पेज
Correct Option : 4

Q92. प्रकाश वर्ष' हे खालीलपैकी कशाचे परिमाण आहे?
Option 1: प्रकाश
Option 2: वेळ
Option 3: खगोलशास्त्रीय अंतर
Option 4: वार्षिक गती
Correct Option : 3

Q93. द.सा.द.शे. १० दराने १५००० रुपयांची ३ वर्षाची चक्रवाढ व्याजाने होणारी रास किती ?

| | |
|---|---|
| Option 1: 18965 | |
| Option 2: 19865 | |
| Option 3: 19965 | |
| Option 4: 18865 | |
| Correct Option : 3 | |

| | |
|---|---|
| Q94. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्यांच्या सदस्य म्हणून राहण्याच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान चूक आहे? | |
| Option 1: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्याने राज्य शासनाकडे आपला लेखी राजीनामा पाठविला व अशा राजीनाम्याचा राज्य शासनाने स्वीकार केला असेल तर सदस्यत्व रद्द होते | |
| Option 2: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्याने काम करण्यास नकार दिला असेल तर त्यास पदावरून तात्काळ दूर केले जाते | |
| Option 3: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्यत्वाच्या अनर्हतेच्या कक्षेत एखादा सदस्य आल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते | |
| Option 4: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सदस्याने काम करण्यास नकार दिला असेल तर त्यासंदर्भातील कारणे दर्शविण्याची संधी देवून त्यास पदावरून दूर केले जाते | |
| Correct Option : 2 | |

| | |
|---|---|
| Q95. कोणत्या महिला खेळाडूने स्वसंरक्षण शिकविण्यासाठी भारतातील पहिला महिला फाईट क्लब सुरु केला? | |
| Option 1: कर्णम मल्लेश्वरी | |
| Option 2: पि टी उषा | |
| Option 3: एम सि मेरी कॉम | |
| Option 4: कृष्णा पुनिया | |
| Correct Option : 3 | |

| | |
|---|---|
| Q96. विशेष आर्थिक क्षेत्रे कार्यान्वित होण्यासाठी शासनाने कोणती आर्थिक प्रोत्साहने दिली आहेत ? | |
| Option 1: जमीन संपादनातून मुद्रांक शुल्क देण्यातून सूट | |
| Option 2: अकृषिक कर देण्यातून सूट | |
| Option 3: गौण खनिजांचे उत्खनन करण्यावरील स्वामित्वधन देण्यातून सूट | |
| Option 4: वरीलपैकी सर्व | |
| Correct Option : 4 | |

| | |
|---|---|
| Q97. महाराष्ट्र औद्योगिक धोरण 2013 मध्ये खालीलपैकी कोणत्या बाबीवर भर देण्यात आला आहे? | |
| Option 1: विशाल व अतिविशाल उद्योगांना एकत्रित प्रोत्साहने | |
| Option 2: रोजगारक्षम उद्योगांना उत्तेजन देण्यासाठी पुढाकार | |
| Option 3: उद्योगांच्या विकासासाठी जमिनीचा पर्याप्त उपयोग करणे | |
| Option 4: वरीलपैकी सर्व | |
| Correct Option : 4 | |

| | |
|---|---|
| Q98. टोमॅटो मध्ये आढळणारे रेबीज ग्लायकोप्रोटीन हे कशाचे उदाहरण आहे? | |
| Option 1: खाद्य संप्रेरके | |
| Option 2: खाद्य विकर | |
| Option 3: खाद्य प्रथिने | |
| Option 4: खाद्य लस | |
| Correct Option : 4 | |

| | |
|---|---|
| Q99. जगातील सर्वात लांब केबल-आधारीत मल्टी-पायलॉन पूलाचे 2013 मध्ये कोठे उद्‌घाटन झाले? | |
| Option 1: रशिया | |
| Option 2: चीन | |
| Option 3: जपान | |
| Option 4: ऑस्ट्रेलिया | |
| Correct Option : 2 | |

| | |
|---|---|
| Q100. खालीलपैकी अचुम्बकीय पदार्थ कोणता? | |
| Option 1: लोह | |
| Option 2: निकेल | |
| Option 3: कोबाल्ट | |
| Option 4: तांबे | |
| Correct Option : 4 | |